**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्तविभाग**
**राष्ट्रीय बातमीपत्र**
**सकाळी 08 वाजून 30 मिनिटं**

**दिनांकः23.08.2024** **वारःशुक्रवार**

---

**ठळक बातम्या**
पोलंडच्या यशस्वी दौऱ्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी आज युक्रेन भेटीवर
संरक्षण मंत्री राजनाथ सिंह चार दिवसांच्या अमेरिकेच्या दौऱ्यासाठी रवाना
पहिल्या राष्ट्रीय अंतरिक्ष दिनानिमित्त आज देशभरात विविध उपक्रमांचं आयोजन
सर्वोच्च न्यायालयाच्या आवाहनानंतर निवासी डॉक्टरांचा संप मागे
आणि
लुसान डायमंड लीग अजिंक्यपद स्पर्धेत भारताचा भालाफेकपटू नीरज चोप्रा दुसऱ्या स्थानावर

**युक्रेन भेट**
पोलंडचा यशस्वी दौरा आटोपल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी आज युक्रेनची राजधानी कीव इथं राष्ट्राध्यक्ष व्होलोडिमिर झेलेन्स्की यांची भेट घेणार आहेत. दोन्ही देशांमध्ये 1992 मध्ये राजनैतिक संबंध प्रस्थापित झाल्यानंतर भारतीय पंतप्रधानांची युक्रेनला ही पहिलीच भेट आहे. या भेटीदरम्यान, दोन्ही नेते आर्थिक आणि व्यावसायिक संबंधांपासून, पायाभूत सुविधा, आरोग्य, शिक्षण, सरंक्षण ते कृषी क्षेत्रापर्यंतच्या सर्व द्विपक्षीय संबंधांवर चर्चा करणार आहेत. युक्रेनमध्ये सुरू असलेल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर ही भेट होत असून, त्यावरदेखील चर्चा होणार आहे. वाटाघाटीद्वारे तोडगा काढण्यासाठी भारतानं सातत्यानं मुत्सद्देगिरी आणि संवादाचा पुरस्कार केला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या युक्रेनच्या ऐतिहासिक भेटीमुळं द्विपक्षीय संबंध अधिक दृढ आणि विस्तारण्यास मदत होईल.

**यू एन चीफ- पीएम मोदी युक्रेन भेट**
पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या युक्रेन भेटीमुळे युद्ध संपण्यास मदत होईल, अशी आशा संयुक्त राष्ट्रांच्या सरचिटणीसांनी व्यक्त केल्यांचं त्यांचे प्रवक्ते स्टीफन दुजारिक यांनी म्हटलं आहे. युक्रेन-रशिया युद्धादरम्यान पंतप्रधान मोदी युक्रेन भेट देत असल्याबद्दल त्यांनी प्रतिक्रिया व्यक्त केली. अनेक देशांच्या प्रमुखांच्या भेटींसह सर्वसाधारण सभेचे ठराव, आंतरराष्ट्रीय कायदा आणि प्रादेशिक एकात्मतेसाठीचे प्रयत्न यामुळे हा संघर्ष थांबवण्यासाठी मदत होईल, अशी अपेक्षा आहे. संयुक्त

राष्ट्रांच्या महासभेनं किमान तीन ठरावांमध्ये रशियानं लष्करी कारवाई थांबवावी अशी मागणी केली आहे, तर एका ठरावात युक्रेनच्या पायाभूत सुविधांवर होणारे हल्ले थांबवण्याची मागणी केली आहे, असंही दुजारिक यांनी म्हटलं आहे.

**पंतप्रधान - पोलंड भेट**

दरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल पोलंडमध्ये वॉर्सा इथं पोलंडचे पंतप्रधान डोनाल्ड टस्क यांच्याशी शिष्टमंडळ स्तरावर चर्चा केली. भारत आणि पोलंडने परस्परसंबंधांना धोरणात्मक भागीदारीत रूपांतरित करण्याचा निर्णय घेतला आहे; असं या बैठकीनंतर जारी केलेल्या संयुक्त निवेदनात सांगण्यात आलं. यावर्षी दोन्ही देश त्यांच्यातील राजनैतिक संबंधांचा 70 वा वर्धापन दिन साजरा करत आहेत. दोन्ही देशांतील संबंध लोकशाही आणि कायद्याचे राज्य यासारख्या सामायिक मूल्यांवर आधारित आहेत, असं मोदी यांनी यावेळी सांगितलं. पंचेचाळीस वर्षांनंतर एका भारतीय पंतप्रधानांनी पोलंडला भेट दिली असून, भारत आणि पोलंडमधील संबंधांमध्ये हा दिवस विशेष महत्त्वाचा आहे, असंही मोदी म्हणाले. पंतप्रधान टस्क हे भारताचे दीर्घकाळापासूनचे मित्र आहेत आणि त्यांनी भारत आणि पोलंडमधील संबंध वाढवण्यात मोठे योगदान दिले आहे. 2022 मध्ये युक्रेन संघर्षात भारतीय विद्यार्थ्यांच्या सुटकेसाठी पोलंडने केलेली मदत भारताचे लोक कधीही विसरू शकत नाहीत, असंही मोदी यांनी नमूद केलं. भारत आणि पोलंड आंतरराष्ट्रीय स्तरावरही घनिष्ठ समन्वयानं पुढे जात आहेत. जागतिक आव्हानांचा सामना करण्यासाठी संयुक्त राष्ट्र आणि इतर आंतरराष्ट्रीय संस्थांमध्ये सुधारणा करणे ही काळाची गरज आहे यावर दोन्ही बाजू सहमत आहेत, असं सांगून मोदी यांनी पोलिश कंपन्यांना मेक इन इंडिया आणि मेक फॉर वर्ल्डमध्ये सामील होण्यासाठी आमंत्रित केलं. जानेवारी 2025 मध्ये पोलंड युरोपियन महासंघाचे अध्यक्षपद स्वीकारणार आहे. पोलंडच्या पाठिंब्यामुळे भारत आणि युरोपियन महासंघ यांच्यातील संबंध अधिक दृढ होतील, असा विश्वासही मोदी यांनी या वेळी व्यक्त केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि टस्क यांनी द्विपक्षीय संबंधांचा आढावा घेतला आणि विविध मुद्द्यांवर विचारांची देवाणघेवाण केली. दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल वॉर्सा इथं अज्ञात सैनिकांच्या समाधीवर पुष्पहार अर्पण केले आणि त्यांना आदरांजली अर्पण केली. पोलंडचे राष्ट्राध्यक्ष आंद्रेज सेबॅस्टियन डुडा यांचीही मोदी यांनी भेट घेतली. दोन्ही नेत्यांनी द्विपक्षीय संबंधांच्या विविध पैलूंवर चर्चा केली. दोन्ही बाजूंनी युक्रेन आणि पश्चिम आशियातील संघर्षांसह प्रादेशिक आणि जागतिक मुद्द्यांवरही चर्चा केली. ‘ऑपरेशन गंगा’ दरम्यान युक्रेनमधून भारतीय नागरिकांना बाहेर काढण्यासाठी पोलंडनं केलेल्या मदतीबद्दल पंतप्रधान मोदी यांनी कृतज्ञता व्यक्त केली. पंतप्रधानांनी राष्ट्रपती डुडा यांना भारतभेटीचे निमंत्रण दिलं.

**कबड्डी - पोलंड**

दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल वॉर्सा इथं पोलंडच्या कबड्डी महासंघाचे अध्यक्ष मिचल स्पिक्झको आणि  सदस्य काल्बार्झिक यांची भेट घेतली. पोलंडमध्ये कबड्डीची लोकप्रियता वाढविण्यासह, भारतीय आणि पोलिश खेळाडूंमधील स्पर्धांची संख्या वाढवण्याबाबत चर्चा केली. काल्बार्झिक 2015 आणि 16 मध्ये भारताच्या प्रो कबड्डी लीगमध्ये बंगळुरू बुल्सकडून सहभागी झाला होता, तसंच त्यानं पोलंडच्या राष्ट्रीय संघातून  अहमदाबाद इथं झालेल्या कबड्डी विश्वचषक 2016 मध्ये देखील भाग घेतला होता.

**मन की बात**

पंतप्रधान नरेंद्र मोदी येत्या रविवारी आकाशवाणीवरील मन की बात या कार्यक्रमातून जनतेशी संवाद साधणार आहेत. या कार्यक्रमाचा हा 113वा भाग असेल.

**राजनाथ सिंह-अमेरिका भेट**

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह काल अमेरिकेच्या चार दिवसांच्या दौऱ्यासाठी रवाना झाले. अमेरिकेचे संरक्षण मंत्री लॉयड ऑस्टिन यांच्या निमंत्रणावरून राजनाथ सिंह काल संध्याकाळी वॉशिंग्टनमध्ये दाखल झाले आहेत राजनाथ सिंह संरक्षण मंत्री लॉयड ऑस्टिन यांच्याबरोबर द्विपक्षीय बैठक घेणार असून अमेरिकेचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार जेक सुलिव्हन यांचीही भेट घेणार आहेत. राजनाथ सिंह यांच्या अध्यक्षतेखाली अमेरिकेच्या संरक्षण उद्योगासोबत सुरू असलेल्या आणि भविष्यातील संरक्षण सहकार्याबाबत एक उच्चस्तरीय गोलमेज बैठकही होणार आहे. नोव्हेंबर 2023 मध्ये झालेल्या पाचव्या वार्षिक भारत-अमेरिका मंत्रिस्तरीय संवादानंतर भारत आणि अमेरिकेनं द्विपक्षीय संरक्षण उपक्रमांमध्ये प्रगती केली आहे. दोन्ही देशांतील संरक्षण क्षेत्रातील संबंध अधिक दृढ करण्याच्यादृष्टीने ही भेट महत्त्वाची ठरणार आहे.

**अंतरिक्ष दिन**

पहिला राष्ट्रीय अंतरिक्ष दिन आज देशभरात साजरा केला जाणार आहे. या निमित्तानं संपूर्ण देशभरात अनेक उपक्रमांच आयोजन करण्यात आलं आहे. नवी दिल्लीतील भारत मंडपम इथं होणाऱ्या मुख्य कार्यक्रमाचे उद्घाटन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते होणार आहे. त्यांच्या हस्ते रोबोटिक्स आणि भारतीय अंतरिक्ष हॅकॅथॉनच्या विजेत्यांचा सन्मान करण्यात येणार आहे. अवकाश विज्ञानातील संशोधनाचा, समाज आणि तंत्रज्ञानावर प्रभाव स्पष्ट करणारी, टचिंग लाइव्हज व्हाईल टचिंग द मून: इंडियाज स्पेस सागा, अशी यंदाची संकल्पना आहे.  गेल्या वर्षी याच दिवशी, चांद्रयान- मोहिमेअंतर्गत चंद्राच्या पृष्ठभागावर विक्रम लँडर सुरक्षितपणे उतरविण्यात भारताला यश आलं. या यशामुळं, भारत

यशस्वी अंतराळ मोहिमांच्या देशांच्या गटात सामील झाला असून 23 ऑगस्ट हा राष्ट्रीय अंतरिक्ष दिवस म्हणून घोषित करण्यात आला.

**निवासी डॉक्टर संप**

दिल्लीतील केंद्र सरकारच्या अखत्यारीतील रुग्णालयातील निवासी डॉक्टरांनी तसंच निवासी डॉक्टर्सच्या संघटनेनं संप मागे घेतला असल्याची घोषणा केली आहे. यात, अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्था, डॉ. राम मनोहर लोहिया रुग्णालय, सफदरजंग रुग्णालय आणि लेडी हार्डिंग मेडिकल कॉलेजसह दिल्लीतील केंद्रसरकारच्या रुग्णालयांचा समावेश आहे. सर्वोच्च न्यायालयानं केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत संघटेनेनं संप मागे घेत असल्याचं सांगितलं आहे.
कोलकातामधील आर. जी. कार वैद्यकीय महाविद्यालयात रुग्णालयात घडलेल्या घटनेची गंभीर दखल तसंच देशभरातील आरोग्य सेवा कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेच्या समस्येकडे लक्ष पुरवल्याबद्दल सर्वोच्च न्यायालयाचे आभार मानत  या समस्यांचं त्वरित आणि निराकरण होण्यासाठी राष्ट्रीय कृती दल स्थापन करण्याच्या आदेशाबद्दलही संघटनेनं समाधान व्यक्त केलं आहे.

**नीरज चोप्रा**

भारताचा अव्वल भालाफेकपटू नीरज चोप्रानं  स्वित्झर्लंडमध्ये सुरू असलेल्या लुसान डायमंड लीग अजिंक्यपद स्पर्धेत दुसरं स्थान पटकावलं. नीरजने 89 पूर्णांक 49 मीटर अंतरावर भालाफेक करत या हंगामातील सर्वोत्तम कामगिरी नोंदवली.

## या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.